RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २७

दि. १६ मे २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# राज्य संघटक संजय भोकरे यांना पोलीस संरक्षणाची

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

संजय भोकरे यांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे

----------------

संरक्षण देण्याचे तातडीने आदेश

**मुंबई/सांगली:** भोकरे यांना मि पुर्णपणे ओळखतो त्यांनी पत्रकारीता शैक्षणिक सामाजिक कार्यात मोलाचे योगदान असून अशा लोकांची सुरक्षा करणे हे आमच्या सरकारचे कामं आहे तर त्यांना पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले आहे तर सांगलीत घटनेचा निषेध व्यक्त केला महाराष्ट्र राज्य हे सुजलाम सुफलाम राज्य असुन गुंडागिरीचा बंदोबस्त करण्यासाठी आमचे सरकार या प्रकरणात लक्ष घातले असून पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा यांच्या कडुन माहिती प्राप्त झाली आहे पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा छडा लावण्यात यशस्वी ठरेल असा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक आणि दैनिक जनप्रवासचे समूह संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणी तीन संशयित



आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून पिस्तूल आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, भोकरे यांना तातडीने राज्य भरात फिरताना पोलीस संरक्षण देण्याची मागणी आज पत्रकार संघाने मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मंत्रालयात प्रत्यक्ष भेटून केली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू बुरे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर, आणि संघाचे सदस्य खंडूराज गायकवाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

### पत्रकार संघाच्या प्रमुख मागण्या

- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत:
- संजय भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका लक्षात घेता त्यांना राज्यभर फिरावे लागते त्यांना राज्यभर कडेकोट पोलीस संरक्षण मिळावे.
- या कटामागील मुख्य बोलविता धनी कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री.भोकरे यांना संरक्षण देण्याची मागणी मान्य केली.

रेकी करून हत्येचा प्रयत्न

अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि इतर घातक शस्त्रे हस्तगत करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून संजय भोकरे यांची रेकी (पाळत ठेवणे) करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशातून हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे.

**प्लॅन बी ची भीती**

या कारवाईनंतर संजय भोकरे यांनी स्वतः प्लॅन बी नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. यावरून संपूर्ण भोकरे कुटुंब गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर असल्याचे स्पष्ट होत आहे.

# लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती नुकतीच गठीत करण्यात आली असून या समितीतील अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीच्या माध्यमातून गोरगरीब माणसांना आधार देण्यासाठी काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती गठीत केली आहे.



लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीवर नियुक्ती करून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून समिती अध्यक्ष बन्सी भिसे आणि सर्व सदस्यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष बन्सी भिसे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, उद्धव काळे, अॅड. मनोज कराड, दीपक वांगसकर, राजकिरण साठे, अॅड. धनराज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, शुभम खोसे, अशोक सावंत, बाळासाहेब कदम, पांडुरंग कदम, किशोर घुटे, संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य स्वाती घुटे, संतोष गायकवाड, सदाम रशीद शेख, रुपेश काळे, बाबासाहेब भिसे, सदाशिव गव्हाणे, अंकुश कुंभार, विनायक मगर, परमेश्वर पर्वते यांच्यासह अनेक जण होते.

# नीट पेपर फुटी प्रकरणी दोषींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची व्ही एस पँथर्स ची मागणी



**लातूर/प्रतिनिधी** : येथील व्ही एस पँथर्स चे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या मार्फत केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठवून नीट पेपर फ ुटी प्रकरणी दोषींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी व्ही एस पँथर्स विद्यार्थी आघाडीच्या वतीने करण्यात आली .अन्यथा व्ही एस पँथर्स तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा देण्यात आला. या निवेदनावर मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे ,विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे जिल्हाउपाध्यक्ष ऋषी ढगे जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे शहर सचिव रोहित दंडे शहर उपाध्यक्ष समीर शेख महेश सुर्यवंशी आदीच्या स्वाक्षरी आहेत .

## रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीकडे वळा

### रासायनिक खतांसाठी अॅग्रीस्टॅकवर नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : पश्चिम आशियाई देशांतील सद्यस्थिती आणि जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र व राज्य शासनाने कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. त्यानुसार रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलेल्या आवाहनानुसार, राज्य शासनाने कृषी विभागामार्फत विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत बिघडत असून, जागतिक बाजारपेठेतील खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होत आहे. ही परिस्थिती विचारात घेता, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक रासायनिक शेतीकडून नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे. यामुळे केवळ जमिनीची सुपीकता टिकणार नाही, तर उत्पादन खर्च कमी होऊन विषमुक्त अन्ननिर्मितीला चालना मिळेल.

अॅग्रीस्टॅकवर नोंदणी करण्याचे आवाहन

भविष्यात रासायनिक खतांची उपलब्धता सुरळीत राहावी आणि खतांचे वाटप पारदर्शक व योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी प्रशासकीय स्तरावर नियोजन करण्यात येत आहे. या नियोजनाचा भाग म्हणून शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅक या प्रणालीवर आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. या नोंदणीमुळे खतांचा संतुलित वापर आणि शासकीय योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे सोपे होणार आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचे माती परीक्षण करून आवश्यकतेनुसारच रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. रासायनिक खतांना पर्याय म्हणून जैविक खते, हिरवळीची खते आणि सेंद्रिय खतांच्या वापरावर भर द्यावा. खतांच्या उपलब्धतेबाबत किंवा तांत्रिक अडचणींबाबत शेतकऱ्यांनी आपल्या भागातील कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी बदलत्या जागतिक परिस्थितीचा विचार करून आणि शासनाच्या धोरणांना प्रतिसाद देऊन नैसर्गिक शेतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# तावरजा मध्यम प्रकल्पातून सिंचनासाठी तातडीने पाणी सोडा

## – माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची मागणी

## – शेतकऱ्यांच्या व्यथांची घेतली तातडीने दखल



**लातूर/प्रतिनिधी** : दिवसेंदिवस तापमान वाढत असल्याने विहिरी कोरड्या पडत आहेत. त्यामुळे ऊस, फळबागा, भाजीपाला आणि अन्य शेतीपिके जगवायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शेतकऱ्यांवर ओढवलेल्या या परिस्थितीची तातडीने दखल घेत लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून तावरजा मध्यम प्रकल्पातून सिंचनासाठी त्वरीत पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

तावरजा मध्यम प्रकल्प हा परिसरातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पावर तावरजा व लगतच्या गावांचे सिंचन क्षेत्र अवलंबून आहे. सद्यस्थितीत कालव्याच्या दुरुस्तीअभावी सिंचनासाठी पाणी सोडण्यात येणार नसल्याचे प्रशासनाकडून शेतकऱ्यांना सांगण्यात येत आहे. मात्र धरणामध्ये पाणी असतानाही पाण्याअभावी शेतातील पिके वाळून जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. पशुधनासाठीही पाणी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

याबाबत परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. याची तातडीने दखल घेत माजी आमदार धिरज देशमुख यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र पाठवून सद्यस्थितीकडे लक्ष वेधले. पाण्याअभावी शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. पिके करपून जात आहेत. पशुधनासाठी सुद्धा पाणी उपलब्ध नाही. शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले असल्याने तात्काळ कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी सोडण्यात यावे, असे पत्रात नमूद केले आहे.

# NEET पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करा; दोषींवर कठोर कारवाई व्हावी

## भाजयुमोची पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

**लातूर/प्रतिनिधी** : देशभरात गाजत असलेल्या NEET परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने लातूर जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. भाजयुमोचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष ओमअप्पा शिवमुर्ती धरणे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

भाजयुमोने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, NEET पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये संताप आणि असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे घेतलेली मेहनत, पालकांनी केलेला आर्थिक खर्च आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेला विश्वास या घटनेमुळे डळमळीत झाला आहे. या प्रकारामुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दोषींना कठोर शिक्षा होणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नाशिक आणि कोल्हापूरनंतर आता या प्रकरणात लातूरचे नाव चर्चेत येत असल्याने संबंधित प्रश्नपत्रिका, हस्ताक्षर, कागदपत्रे आणि इतर पुरावे यांची न्यायवैद्यकीय तपासणी करण्यात यावी, अशी मागणी भाजयुमोच्या वतीने करण्यात आली. तसेच या गैरप्रकाराचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्याशी संबंधित मध्यस्थ, खाजगी क्लासेस चालक, वसतिगृह चालक तसेच इतर संबंधित व्यक्तींनाही तपासाच्या कक्षेत आणावे, अशी मागणी करण्यात आली.



पेपरफुटीसारखा गंभीर प्रकार हा देशाच्या भविष्यासोबत केलेला विश्वासघात असून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणाऱ्यांना कोणतीही माफी मिळू नये, अशी भूमिका भाजयुमोने स्पष्ट केली. संपूर्ण रॅकेट उघड करून संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे म्हणाले, देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना कोणतीही माफी मिळू नये. निष्पक्ष तपास होऊन संपूर्ण सत्य बाहेर आले पाहिजे आणि दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे.


या वेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, सरचिटणीस अक्षय स्वामी, उपाध्यक्ष धीरज मोरे, गणेश बेद्रे, मंडळाध्यक्ष रोहित चवळे, चिटणीस सचिन गुट्टे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

संपादकीय...

## क्रिकेटचा खेळ सध्या भलत्याच कारणांमुळे चर्चेत

'जेण्टलमन्स गेम' म्हणून ओळखला जाणारा क्रिकेटचा खेळ सध्या भलत्याच कारणांमुळे चर्चेत आला आहे. मैदानावर बॅट आणि बॉलच्या सामान्यातील रंगत फिकी पडून, पॅव्हेलियनमधील दृश्ये 'रसभरीत' ठरू लागली आहे. किमान यंदाचा आयपीएल सिझन तरी एवढ्याचसाठी आणि विशेषत्वाने 'गर्लफ्रेंड कल्चर'साठी लक्षात राहणार आहे. कॅमेऱ्यासमोर जे दिसतंय त्यापेक्षा कितीतरी जास्त कॅमेऱ्यामागे खरोखर घडतंय आणि हे सगळं इतकं गंभीर आहे की, नियामक मंडळाला त्यासाठी धोरण आखण्याची गरज भासते आहे. क्रिकेटचा खेळ भारतीयांसाठी केवळ मनोरंजन नाही तर प्रत्येक युवा पिढी घडविणारा एक धर्म आहे. प्रश्न खेळभावनेचा तर आहेच; सोबतच खेळातील नीतिमूल्यांचा आणि संयमाचा आहे. आज लहानशी दिसणारी ही समस्या वास्तवात हाताबाहेर गेलेलं प्रकरण आहे. मुंबई इंडियन्सच्या कर्णधारापासून सुरू झालेलं हे प्रकरण पॅव्हेलियनमध्ये बसून वेपिंग करण्यापर्यंत गेलं आहे. मालिकेदरम्यान, पत्नी किंवा अगदी कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला खेळाडूसोबत हॉटेलमध्ये राहण्याची परवानगी होती. पण, अलिकडे खेळाडूंच्या गर्लफ्रेंड्सचे प्रस्थ वाढलेले दिसू लागले. मैदानावर खेळाडूंना घेऊन जाणारी बस या गर्लफ्रेंड्ससाठी थांबू लागली, आयपीएलच्या संपूर्ण प्रक्रियेतील गोपनीयता चव्हाट्यावर येऊ लागली. बहुतांश 'गर्लफ्रेंड्स' सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असल्यामुळे स्टेडियमच्या आत-बाहेरचं सगळंच रील्समध्ये झळकू लागलं. विशेषत: हार्दिक पांड्याच्या प्रकरणानंतर हे विशेषत्वाने उघड झालं. आयपीएलपूर्वी एकदिवसीय सामन्यांच्या विश्र्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही 'खुल्लम खुल्ला' प्रेमाची चर्चा झालीच. गर्लफ्रेंड्स सोबत मिरवण्यामुळे संघशिस्तीचा भंग, खेळामध्ये एकाग्रता नसणे आणि सुरक्षा नियमांचं उल्लंघन वारंवार घडू लागलं आणि यातून 'गर्लफ्रेंड कल्चर'चा उदय झाला. युवापिढीसाठी 'रोल मॉडेल' असणारे खेळाडू सामना सुरू असताना, कॅमेऱ्यांसमोर ई-सिगारेट ओढून वेपिंग करत असतील, तर चाहते म्हणून आपल्यालाच क्रिकेटचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. कोणत्याही खेळाडूसाठी शिस्त हा दागिना असावा, ओझं नाही. डग आऊटमध्ये बसून किंवा व्लॉग्ज्मध्ये, खेळाविषयीच्या चर्चेपेक्षा नशेच्या धुराची वलयं दिसत असतील तर हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही तर, कोट्यवधी भारतीयांच्या विश्र्वासाची उघडउघड केलेली हत्या आहे. क्रिकेटचे मैदान पब किंवा क्लब नाही की, खेळाडू तिथे बसून नशा करतील. मैदान तर खेळाडूंच्या घामाच्या थेंबांची शाई करून इतिहास लिहिण्यासाठी आहे. कॅमेऱ्यासमोर नशेडी क्रिकेटपटूंना बघणाऱ्या लोकांच्या मनात साहजिकच प्रश्र्न येतो की, कॅमेऱ्यासमोर हे असं आहे तर मागे काय सुरू असेल? 'नो गर्लफ्रेंड' आणि नशा रोखण्यासाठी कठोर सुरक्षा यंत्रणा लावणाऱ्या बीसीसीआयला आज कोणी बुरसटलेल्या विचारांचे म्हणत असले, तरी क्रिकेटला सोशल मीडियाचा 'कंटेंन्ट' बनविण्यापासून रोखण्यासाठी अशी कार्यवाही आवश्यक आहे. या सगळ्या गोंधळात आरोप-प्रत्यारोप झाले आणि त्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून क्रीडा पत्रकारांवरही ठपका ठेवला गेला. पण, यथावकाश ट्विट डिलीट झाल्या आणि बदलल्याही गेल्या. खेळभावनेतून जय-पराजय स्वीकारावा, हे तर क्रीडातंत्राचे मूळ आहे. आताशा लोकतंत्रातही पराभव स्वीकारून पद सोडणे, किती कठीण आहे हे आपण पश्र्चिम बंगालमध्ये बघत आहोतच. पैसा आणि यश डोक्यात जाणार असेल तर आयपीएलच्या सगळ्या युवा खेळाडूंनी थोडं थांबून विचार करण्याची आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या भारतीय क्रिकेटच्या धुरंधरांच्या 'लीगसी'कडे वळून बघण्याची गरज आहे. आयपीएलची खरी ताकद त्यात असलेल्या पैसा आणि ग्लॅमरच फक्त नाही तर लोकांचे प्रेम आहे. क्रिकेटचा तो खेळ आहे ज्याने गल्लीबोळांपासून भव्य स्टेडियमपर्यंत भारतीयांची मनं जोडली आहेत.ऋळीश्रषीळशपव ऊीश्र्ीीीश' क्रिकेट म्हणजे निर्जीव व्हिडीओ गेम नाही. त्यातील थरार, जिंकण्याची धडपड, पराभवानंतरचा मोकळेपणा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'हिरो' म्हणून असलेली खेळाडूंची प्रतिमा क्रिकेटधर्मीयांना हवी आहे. आयपीएलची व्ह्युअरशिप घसरण्यामागे हेदेखील एक कारण आहे. आयपीएलचे ग्लॅमर, खेळाडूंचा 'सेलिब्रिटी' बनण्याचा झटपट झालेला प्रवास, सुमार परफॉर्मन्समध्येच हाती खेळणारा पैसा आणि त्यातून आलेला वैयक्तिक अहंकार 'इतिहास' घडवू शकणार नाही. क्रिकेटचा आत्मा वाचविण्यासाठी खेळाडूंना शिस्त आणि संयम बाळगून 'गर्लफ्रेंड कल्चर'मधून बाहेर पडावं लागेल.



# संग्रहालय : स्मृती, संस्कृती आणि भविष्याचा जिवंत सेतू




इतिहास केवळ पुस्तकांच्या पानांत राहत नाही; तो वस्तूंमध्ये, अवशेषांत, शिल्पांत, चित्रांत, हस्तलिखितांत आणि विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभ्या असंख्य स्मृतींमध्ये जिवंत असतो. एखाद्या राष्ट्राची ओळख त्याच्या वर्तमानाच्या झगमगाटाने जितकी ठरते, तितकीच ती त्याने आपल्या भूतकाळाशी राखलेल्या नात्यानेही ठरते. म्हणूनच संग्रहालय हे केवळ जुन्या वस्तू ठेवण्याचे दालन नाही; ते एका समाजाच्या स्मृतींचे घर असते. १८ मे रोजी साजरा होणारा जागतिक संग्रहालय दिन हा केवळ औपचारिक दिन नसून आपल्या सांस्कृतिक वारशाकडे नव्याने पाहण्याची संधी आहे. आजचा काळ वेगाचा आहे माहितीचा, तंत्रज्ञानाचा, बदलाचा आणि विस्मृतीचाही. रोज नवे घडते आणि कालचे सहज मागे पडते. या धावत्या जगात संग्रहालये आपल्याला थांबायला शिकवतात. ती सांगतात की भविष्य घडवायचे असेल, तर भूतकाळ समजून घ्यावा लागतो. कारण इतिहास हा केवळ कालक्रम नसतो; तो समाजाच्या आत्म्याचा आरसा असतो.

संग्रहालयात ठेवलेली प्रत्येक वस्तू निःशब्द असते; पण ती बोलत असते. एखादी मातीची मूर्ती, तांब्याचे भांडे, प्राचीन शस्त्र, जुन्या नाण्यांचा संच, एखाद्या राजाचा शिलालेख, एखाद्या क्रांतिकारकाचे पत्र किंवा एखाद्या संताचे हस्तलिखित या साऱ्या वस्तू काळाच्या पलीकडचा संवाद साधत असतात. त्या आपल्याला सांगतात की आपण कुठून आलो, कसे घडलो आणि आपल्या संस्कृतीने कोणते मूल्य जपले. दुर्दैवाने आपल्या समाजात संग्रहालयांकडे पाहण्याची दृष्टी अजूनही मर्यादित आहे. अनेकांसाठी संग्रहालय म्हणजे शाळेच्या सहलीत एकदा पाहायचे ठिकाण किंवा पर्यटनाच्या यादीतील एक औपचारिक टप्पा. पण प्रत्यक्षात संग्रहालय हे शिक्षणाचे, संवेदनशीलतेचे आणि नागरिकत्वाचे महत्त्वाचे विद्यापीठ आहे. तिथे इतिहास पाठ करून कळत नाही तर तो अनुभवून समजतो.

आज आपण डिजिटल युगात जगत आहोत. मोबाईलच्या स्क्रीनवर जग मावले आहे. माहिती एका क्लिकवर मिळते. पण माहिती आणि जाण यांत फरक असतो. इंटरनेट माहिती देते, संग्रहालय संदर्भ देते. स्क्रीनवर एखाद्या वस्तूचा फोटो दिसतो, पण संग्रहालयात त्या वस्तूची वेळ, संदर्भ, उपयोग आणि मानवी कथा दिसते. म्हणूनच संग्रहालये आज अप्रासंगिक नाहीत, उलट अधिक आवश्यक झाली आहेत. भारतीय संस्कृतीचा विचार केला, तर भारत देश जणू अनेक थरांनी घडलेली सभ्यता

आहे. सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक स्वातंत्र्यलढ्यापर्यंतचा इतिहास येथे एकमेकांत गुंफलेला आहे. विविध भाषा, धर्म, पंथ, कला, स्थापत्य, लोकपरंपरा आणि सामाजिक चळवळी यांचा विलक्षण संगम येथे आढळतो. या विविधतेचे साक्षीदार म्हणजे आपली संग्रहालये. ती केवळ राजे-महाराजांचा इतिहास जपत नाहीत; ती सामान्य माणसाचेही जगणे नोंदवतात. मात्र, एक कठोर वास्तव स्वीकारावे लागेल. आपल्या अनेक संग्रहालयांची अवस्था समाधानकारक नाही. काही ठिकाणी धुळीने माखलेले अवशेष, अपुरी माहितीफलक, कालबाह्य मांडणी, तुटपुंज्या सुविधा आणि लोकांपर्यंत पोहोचण्यातली कमतरता दिसून येते. वारसा जपण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही; ती समाजाचीही आहे. शासन, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांनी मिळूनच ही जबाबदारी उचलली पाहिजे.

आजच्या पिढीला इतिहासाशी जोडण्याचे आव्हान अधिक मोठे आहे. मुलांना भूतकाळ शिकवायचा असेल, तर तो जिवंतपणे दाखवावा लागेल. संग्रहालये ही त्यासाठी प्रभावी माध्यमे ठरू शकतात. शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन संग्रहालयभेटीला शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनवले पाहिजे. कारण जे डोळ्यांनी पाहिले जाते, ते मनात अधिक काळ टिकते. संग्रहालयांचे महत्त्व केवळ सांस्कृतिक नाही तर ते सामाजिक आणि लोकशाहीदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. इतिहासावर ज्याचा ताबा, भविष्याची दिशा अनेकदा त्याच्याकडे जाते. म्हणूनच वस्तुनिष्ठ, समावेशक आणि चिकित्सक इतिहासाची जपणूक अत्यावश्यक आहे. संग्रहालये समाजाला स्मरण करून देतात की इतिहास एकाच आवाजाचा नसतो; त्यात अनेक अनुभव, अनेक वेदना, अनेक विजय आणि अनेक संघर्ष सामावलेले असतात. विशेषतः आजच्या काळात, जेव्हा ओळखींच्या राजकारणातून इतिहासाचे अनेक अर्थ लावले जातात, तेव्हा संग्रहालयांची जबाबदारी अधिक वाढते. ती केवळ प्रदर्शनस्थळे नसून संवादाची जागा असली पाहिजेत. तिथे अभिमान असावा, पण अंधगौरव नसावा तर चिकित्सकता असावी, पण तुच्छताही नसावी. इतिहासाशी प्रामाणिक राहणे हीच संग्रहालयांची खरी प्रतिष्ठा आहे. नागपूर सारख्या शहरांमध्ये स्थानिक इतिहास, सामाजिक चळवळी, साहित्यिक वारसा, औद्योगिक परिवर्तन आणि लोकसंस्कृती यांचे दस्तऐवजीकरण अधिक व्यापकपणे व्हायला हवे. प्रत्येक प्रदेशाची स्वतःची स्मृती असते. त्या स्मृती हरवल्या, तर फक्त वस्तू हरवत नाहीत तर एक सामूहिक ओळख हरवते.

आज जगभर संग्रहालयांची संकल्पना बदलत आहे. ती केवळ वस्तूंचे दालन राहिलेली नाहीत. संवादात्मक प्रदर्शन, डिजिटल पुनर्निर्मिती, ध्वनी-दृश्य सादरीकरण, मुलांसाठी अनुभवात्मक शिक्षण आणि समुदायाचा सहभाग या माध्यमांतून संग्रहालये अधिक जिवंत होत आहेत. आपणही ही दिशा स्वीकारली पाहिजे. वारसा जपणे म्हणजे केवळ कुलूप लावणे नव्हे तर तो लोकांपर्यंत अर्थपूर्ण पद्धतीने पोहोचवणे होय. संग्रहालये अर्थव्यवस्थेशीही जोडलेली आहेत. सांस्कृतिक पर्यटन, स्थानिक रोजगार, हस्तकला, मार्गदर्शक सेवा, संशोधन आणि प्रकाशन अशा अनेक क्षेत्रांना संग्रहालये चालना देऊ शकतात. पण त्यासाठी संग्रहालयांकडे 'खर्च' म्हणून नव्हे, तर 'गुंतवणूक' म्हणून पाहावे लागेल. एक आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लोकसंग्रहालयांचा. मोठ्या राष्ट्रीय संग्रहालयांइतकेच स्थानिक आणि लोकस्मृती जपणारी लहान संग्रहालयेही महत्त्वाची आहेत. एखाद्या गावातील जुनी शेतीची अवजारे, लोककलेचे नमुने, पारंपरिक वेशभूषा, ग्रामजीवनातील वस्तू हेही तितकेच मौल्यवान वारसासामान आहे. इतिहास फक्त राजवाड्यांत घडत नाही; तो चुलीपाशी, शेतात, बाजारात आणि लोकगीतांतही घडतो.



आजचा माणूस आधुनिकतेच्या मोहात अनेकदा मुळांपासून दूर जात आहे. प्रगती आवश्यक आहे; पण मुळे विसरून केलेली प्रगती अनेकदा रिकामी ठरते. संग्रहालये आपल्याला सांगतात बदल स्वीकारा, पण स्मृती हरवू देऊ नका. कारण ज्यांना आपला भूतकाळ ठाऊक नसतो, त्यांचे भविष्य अनेकदा उथळ ठरते. जागतिक संग्रहालय दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसावा; तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण आपल्या वारशाशी किती जोडलेले आहोत? मुलांना आपण इतिहासाशी कसे परिचित करून देतो? आपल्या शहरातील, गावातील स्मृती आपण जपतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची ही वेळ आहे. आज गरज आहे ती संग्रहालयांना जिवंत करण्याची. तिथे फक्त वस्तू नसाव्यात; कथा असाव्यात. फक्त अवशेष नसावेत; संवाद असावा. फक्त स्मृती नसाव्यात; प्रेरणा असावी. कारण संग्रहालये भूतकाळाची समाधी नसतात; ती भविष्याच्या जाणिवेची पाळेमुळे असतात. ती आपल्याला शिकवतात की काळ पुढे जातो, पण मूल्ये टिकवावी लागतात. संस्कृती जपावी लागते. स्मृतींचे रक्षण करावे लागते. जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने आपण हा संकल्प करू या, आपल्या इतिहासाचा अभिमान बाळगू, पण तो समजून घेऊन आपल्या वारशाचे जतन करू, पण तो लोकांपर्यंत पोहोचवून आणि आपल्या पुढच्या पिढ्यांना फक्त माहिती नव्हे, तर स्मृतींची जाण देऊ. कारण शेवटी, संग्रहालयातील एखादी शांत वस्तू कधीकधी संपूर्ण पिढीला विचार करायला भाग पाडते आणि तेव्हाच कळते भूतकाळ जपणे म्हणजे मागे जाणे नव्हे; तर पुढे जाण्यासाठी स्वतःला ओळखणे होय.

........................

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

# जनगणने मध्ये धर्म बौद्ध आणि जात महार का लिहावे ?

बौध्द समाजातील समस्त बंधू-भगिनींना विनम्रपणे एक सुचना करु इच्छितो की, आजच्या २०२६-२७ या दोनवर्षा मध्ये आपल्या घरोघरी जनगणना करण्यासाठी लोक येणार आहेत. तेव्हा त्यांना माहिती देत असताना सन्माननीय भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमरावजी आंबेडकर साहेब यांनी केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने धर्माच्या रकान्यात बौद्ध आणि जातीच्या रकान्यात महार ह्या दोन बाबी लक्षपूर्वक लिहून दिल्या पाहिजेत! त्या अनुषंगाने आपण त्या आदेशाचे अनुपालन करावे त्याचप्रमाणे आपण जी बुद्ध वंदना घेतो ती पाली भाषेत घेत असल्यामुळे आपणास मराठी, हिंदी व इंग्रजी आणि खास करून पालीभाषा सुद्धा अवगत आहे. याचे आपण त्या लोकांना स्पष्टीकरण दिले पाहिजे! असे आदेशित करण्याचे कारण की,भारतीय समाजात आजही जाती व्यवस्था कायम आहे,ती जिवंत आहे त्यामुळे आपण पूर्वीचे महार आणि धार्मिक दृष्ट्या धर्मांतर केल्यामुळे बौद्ध धर्म स्वीकारलेला आहे.परंतु आपण पूर्वाश्रमीच्या जातीव्यवस्थेनुसार महार होतो.

आणि त्याच अवस्थेत आपण बौद्ध धर्म स्वीकारला म्हणून धर्माने आपण बौध्द असून जातिव्यवस्थेतुन आपले जात्यांतर झाले नाही असा त्याचा अर्थ होतो. तसेच आपल्या शाळेच्या दाखल्यावर आजही आपली जात लिहून येते. त्यामुळे तीच पूर्वाश्रमीची जात लिहावी लागते. अशा परिस्थितीत सांगायचे झाल्यास आपण आपणास जाच करणाऱ्या त्या हिंदू धर्माला सोडचिठ्ठी दिली आहे खरी आणि बौद्ध धम्माचा अंगीकार केलेला आहे खरा.परंतु सध्याच्या परिस्थितीत हा विषय सामान्य लोकांना समजण्यासाठी फार मोठा किचकट झालेला आहे त्यात अनेक अतीविद्वान लोक सामान्य जणांची दिशाभूल करीत आहेत वस्तुतः कायद्याचा अभ्यास करून जर ही बाब प्रस्तुत करण्यात आली तर समाजाचा फार मोठा फायदा होईल!

अन्यथा आपल्या सामाजिक स्थितीवर जो नियोजन आयोग विकासात्मक दृष्टीने आपल्या शिक्षणासाठी,आरोग्यासाठी,रोजगारासाठी त्याचप्रमाणे अन्न वस्त्र आणि निवाऱ्या सारख्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी ज्या निधीची वेगळी तरतूद करीत असते त्यात मोठी बाधा येऊ शकते. त्यासाठी आपली लोकसंख्या किती? आपला धर्म कोणता? आपली हिंदू समाज व्यवस्थेनुसार पूर्वाश्रमिची जात कोणती? यावर अवलंबून असते म्हणूनच आपण या देशातील जातीव्यवस्थेनुसार पूर्वीचे महार आणि सध्या धर्मांतरित बौद्ध आहोत म्हणून अशा प्रकारची नोंद करणे गरजेचे आहे हा लेख मी माझ्या अल्पशा अभ्यासा अंती निष्कर्ष काढून आपल्यासमोर सादर केला आहे. तसा मी काही कायद्याचा अभ्यासक नाही ना मोठा काही विद्वान.परंतु जेवढे मला ज्ञात झाले तेवढेच प्रस्तुत करीत आहो. याची नोंद घ्यावी!

बांधवांनो आपल्या आजच्या या देशाचे वैशिष्ट्यही असे आहे की,इथली सारी गणिते ही जातीय समीकरणावरून ठरविल्या जातात त्यामुळे बौद्धांनी पूर्वा श्रमीची जात लिहिणे गरजेचे आहे परंतु बौद्ध ही जात नसून तो फक्त नैतिक दृष्ट्या व्यवहारिक कर्म सांगणारा विचार आहे अर्थातच यालाच धम्म म्हणतात आणि बौद्ध धम्मात जाती व्यवस्था नसल्यामुळे आपणास जातीच्या रकान्यात बौद्ध हा शब्द कदाचितही टाकता येत नाही.अशा प्रकारे अतिक्लीस्ट विषयाला आपण सामोरे जात असताना आपल्या भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सल्लागार ऍड.बाळासाहेब आंबेडकर हे खूप मोठे विद्वान आणि संविधानिक बाबींचे गाढे अभ्यासक आहेत हे आपल्या सर्वांना ज्ञात आहेच त्यामुळे आपणास चिंता करण्याची गरज नाही. आपला कायद्याचा अभ्यास अजिबात नाही त्यामुळे हा विषय आपल्यातील एखाद्या निष्णांत वकीलाने हाताळून जर त्याचे आपल्या अनेकांच्या बुद्धीला पटण्यासारखे स्पष्टीकरण सादर केले असते तर त्यावर विचार करायला हरकत नसती,मात्र तसे काही नाही तर नुसते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नातवांवर व्यक्तिगत हेव्या दाव्यापोटी कुणी आग पाखड करत असेल कींवा प्रसिद्धीच्या हव्यासापोटी कोणी वाटेल ते काहीही बरळत असेल तर त्याला कवडीची किंमत देऊ नये! हे तमाम सुजाण नागरिकांनी समजून घ्यावे आणि दीड दमडीत विकल्या जाऊन बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन त्यांच्यावर इथून तिथून सर्वच्या सर्व रक्ताच्या वारसांवर टीका टिप्पणी कोणी करावी हे काही माझ्या बुद्धीला पटण्यासारखे नाही. आणि तमाम आंबेडकरी समाजाला सुद्धा हा वायफळ उद्योग करणारा व्यक्ती मान्यच असणार नाही अशी मला आशा आहे म्हणून आंबेडकरी जनतेने असे अनाप शनाप वक्तव्य करणाऱ्यांचा हिशोब टिशोब लवकर केला पाहिजे! एवढेच या ठिकाणी नमूद करतो आणि थांबतो जय भीम जय भारत



**जीवन बोदडे**
**८८८८७५७७०३,**
**भांबेरी,जिल्हा अकोला.**

## संक्षिप्त...

### पुण्यात महिलेचा राडा! तरुणावर भररस्त्यात शस्त्रानं सपासप वार

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात एका महिलेने आपल्या चार साथीदारांसह मिळून मोठा राडा केला. त्यांनी एका तरुणावर आणि त्याच्या आईला भररस्त्यात बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या महिलेने केवळ मारहाणच केली नाही, तर परिसरात उभ्या असलेल्या वाहनांची तोडफफोड करून मोठी दहशत निर्माण केली. याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी महिलेसह तिच्या साथीदाराला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला पल्लवी संभाजी लवाटे (वय ४०, रा. धानोरी) आणि जखमी कुटुंब हे एकाच भागात राहतात. त्यांच्यामध्ये पूर्वीपासूनच वादाची ठिणगी पडलेली होती. याच रागातून पल्लवी लवाटे हिने आपल्या साथीदारांसह हल्ला करण्याचा कट रचला. घटनेच्या रात्री पीडित तरुण रिक्षामध्ये बसलेला असताना, पल्लवी आणि तिच्या साथीदारांनी त्याला गाठलं. पल्लवी लवाटे हिच्यासोबत असलेल्या एका आरोपीने लोखंडी शस्त्राने तरुणावर गंभीर वार केले. मुलगा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून त्याची आई मदतीला धावून आली. मात्र, संतापलेल्या या महिलेने आणि तिच्या साथीदारांनी मुलाच्या आईलाही सोडलं नाही. त्यांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

हल्ला केल्यानंतर या टोळक्याने परिसरातील शांतता भंग केली. आरोपींनी रस्त्यावर उभ्या असलेल्या अनेक वाहनांची तोडफफोड केली. या राड्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. विश्रांतवाडी पोलिसांनी या प्रकरणी वेगाने तपास चक्रे फिरवून पल्लवी लवाटे आणि शुभम उर्फ शेगर ठाकूर (२२) यांना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्यासोबत असलेल्या दोन अल्पवयीन मुलांनाही ताब्यात घेण्यात आले असून, इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

### डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या निधनाने मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणारे समर्पित व्यक्तिमत्व गमावले – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ, विचारवंत आणि लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या निधनाने मानसिक आरोग्य क्षेत्रात संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेने कार्य करणारे व्यक्तिमत्व गमावले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत डॉ. नाडकर्णी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की,डॉ. आनंद नाडकर्णी यांनी केवळ एक मानसोपचारतज्ज्ञ म्हणूनच नव्हे, तर एक प्रख्यात लेखक, कवी, नाटककार आणि विचारवंत म्हणून हजारो तरुणांच्या आणि नागरिकांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा दिली. डॉ. नाडकर्णी यांनी स्थापन केलेल्या इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ आणि मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रातील त्यांचे योगदान येणाऱ्या पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. त्यांच्या निधनाने वैद्यकीय, सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील एक मार्गदर्शक हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी डॉ. नाडकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### अंगाई-युनिसेफ च्या मोहिमेमुळे आंबेवाडी गाव बालविवाहमुक्त; जनजागृती मोहिमेला गावकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई/प्रतिनिधी :** बालविवाह मुक्तीकडे वाटचाल करत राज्य शासनाच्या सहकाऱ्याने 'अंगाई-युनिसेफ'ने धाराशिव जिल्ह्यातील आंबेवाडी गावात जनजागृती मोहीम राबविली. या मोहिमेला प्रतिसाद देत गेल्या दोन वर्षापासून आंबेवाडी गावात एकही बालविवाह झाला नसल्याची माहिती युनिसेफने पत्रकाद्वारे दिली आहे.

गावाने बालविवाहा विरोधात एक सकारात्मक आणि प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. सलग दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या 'उत्सव समतेचा' आणि 'मीना राजू मंच' या अभियानांमुळे गावात सामाजिक परिवर्तन घडताना दिसत आहे. अंगाई-युनिसेफ यांच्या सहकार्याने धाराशिव जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात १२० शाळा, ८०० हून अधिक शिक्षक आणि सुमारे १८ हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत. स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्थानिक संस्थांनीही अभियानाला सक्रिय सहकार्य केले.

गावात आयोजित 'उत्सव समतेचा' कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी ढोल-ताशे, लेझीम, गीते आणि घोषणांच्या माध्यमातून बालविवाह, लैंगिक भेदभाव आणि मुलींच्या शिक्षणाबाबत व्यापक जनजागृती केली. 'बालविवाह बंद करा' आणि 'मुलींना शिक्षण द्या' अशा घोषणांसह विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून रॅली काढून नागरिकांना जागृत केले. मंदिर परिसरात गावातील नागरिकांनी बालविवाह रोखण्याची आणि प्रत्येक मुलीला शिक्षणाची संधी देण्याची सामूहिक शपथ घेतली. 'माझं लग्न लहान वयात झालं होतं, पण माझ्या नातीला तसं आयुष्य देणार नाही,'' असे गावातील महिला आश्वासित करताना दिसत आहेत.

शाळांमध्ये आयोजित नाटक, भाषण, वादविवाद आणि भूमिका परिवर्तन यासारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. इयत्ता आठवीतील समीक्षा हिने, ''आता मुलं स्वयंपाक करतात आणि मुली फुटबॉल खेळतात. माझं कुटुंब माझ्या समानता आणि शिक्षणाचा संदेश आता गावाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहे असे विश्वासाने सांगितल्याची माहिती युनिसेफने दिली.

# २६ वर्षांपासून प्रलंबित सातबारा दुरुस्तीचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारामुळे दोन दिवसांत निकाली

**लातूर/प्रतिनिधी :**एका तलाठ्याच्या चुकीमुळे सातबारा उताऱ्यावर २६ वर्षांपूर्वी झालेली चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या एका ८५ वर्षीय वृद्धाला लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या संवेदनशीलतेमुळे अखेर न्याय मिळाला आहे. वयोवृद्ध शेतकरी प्रभाकर प्रयाग यांचा काही वर्षांपासून रेंगाळलेला सातबारा दुरुस्तीचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ दोन दिवसांत मार्गी लावला.




लातूर येथील रहिवासी प्रभाकर विनायकराव प्रयाग (वय ८५) यांची खोपेगाव शिवारात वडिलोपार्जित जमीन आहे. २६ वर्षांपूर्वी वासनगाव तलावाच्या कालव्यासाठी या परिसरातील जमीन संपादित करण्यात आली होती. हा कालवा वास्तविक प्रभाकर प्रयाग यांच्या भावाच्या शेतातून गेला होता. मात्र, तत्कालीन तलाठ्याच्या नजरचुकीमुळे श्री. प्रयाग यांच्याही सातबाऱ्यावर ६ आर जमीन संपादित झाल्याची नोंद करण्यात आली. ही चुकीची नोंद काढण्यासाठी श्री. प्रयाग मागील काही वर्षांपासून प्रशासनाकडे दाद मागत होते, मात्र हा तांत्रिक पेच सुटत नव्हता.

या प्रकरणाची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या निदर्शनास येताच त्यांनी विलंब न लावता स्वतः या प्रकरणाची फाईल मागवून घेतली. प्रकरणाचे गांभीर्य आणि श्री. प्रयाग यांचे वय लक्षात घेऊन त्यांनी संबंधित विभागाला तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर प्रशासकीय यंत्रणेने चक्रे फिरवून अवघ्या दोन दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि त्रुटीमुक्त नवीन सातबारा तयार केला. गुरुवार, १४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी श्री. प्रयाग यांना आपल्या कार्यालयात बोलावून त्यांच्या हाती दुरुस्त केलेला सातबारा सुपुर्द केला. २६ वर्षांचा प्रश्न मार्गी लागल्याने श्री. प्रयाग यांनी अत्यंत भावूक होत जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

महसूल विभागाशी संबंधित प्रकरणे प्रलंबित असल्यास किंवा संबंधित कर्मचारी दाद देत नसल्यास, कोणत्याही कामासाठी विहित शुल्कापेक्षा जास्त पैशांची मागणी केल्यास नागरिकांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे. याबाबत तातडीने कार्यवाहीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या आहेत. तसेच नागरिक थेट जिल्हाधिकारी कार्यालयातही याबाबत अर्ज करू शकतात, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## पुण्याच्या धर्तीवर मुंबईतही प्रत्येक घराला मिळणार 'प्रॉपर्टी कार्ड'

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्याच्या धर्तीवर आता मुंबईतील प्रत्येक घराला हक्काचे 'प्रॉपर्टी कार्ड' मिळणार आहे. ''आधी मोजणी, मग नोंदणी आणि त्यानंतर थेट प्रॉपर्टी कार्ड दिले जाईल. यामुळे 'लँड टायटलिंग' करणारी मुंबई देशात पहिली ठरेल,'' अशी महत्त्वपूर्ण घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली. मुंबई उपनगरातील धनदांडग्यांच्या घशात जाणारी तब्बल ५ हजार कोटी रुपयांची शासकीय जमीन जिल्हाधिकाऱ्यांनी अतिक्रमणमुक्त केल्याचे कौतुक करत, सरकारी जमिनी बळकावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

अंधेरी येथील शहाजीराजे भोसले क्रीडा संकुलात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानात' महसूलमंत्री बोलत होते. यावेळी सर्वसामान्यांची अडवणूक करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांना त्यांनी कडक शब्दांत तंबी दिली. ''महसूल विभागातील अधिकाऱ्यांची एक चुकीची सही सर्वसामान्यांचे कुटुंब उद्ध्वस्त करू शकते, कोणाचा जीव घेऊ शकते. अधिकारी जेव्हा जनतेला वेठीस धरतात, तेव्हा तीव्र मनस्ताप होतो. जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्यावर सोपवली असून, अधिकाऱ्यांनीही जनतेच्या मनातले काम केले पाहिजे,'' अशा शब्दांत बावनकुळे यांनी सुनावले.

## महाराष्ट्राची ८० वर्षाच्या महिलेला टोळीसह उत्तराखंडमधून अटक; चोरीची पद्धत एकूण पोलीसही चक्रावून गेले!

डोईवाला : उत्तराखंडमधील डोईवाला येथील एका सराफी दुकानातील चोरीच्या तपासादरम्यान आरोपींना अटक केल्यानंतर पोलीसदेखील चक्रावून गेले. वयाच्या ८० व्या वर्षी महिलांना घराबाहेर पडणंदेखील शक्य नसते. या वयात एका आजीनं टोळी चालवून काही सराफाच्या दुकानात चोऱ्या केल्या आहेत. पोलिसांनी महिलेह तिच्या टोळीतील सदस्यांना अटक केली.

दरोडेखोरांनी स्थानिक दुकानातून लाखो रुपयांचे दागिने लंपास केले. या चोरीनंतर, ती महिला आणि तिची टोळी महाराष्ट्रात पळून जाण्याच्या बेतात होती. पळून जाण्यापूर्वीच पोलिसांनी टोळीला जेरबंद केले.

विमल नावाची ८० वर्षीय महिला दरोडेखोराची टोळी चालवत होती. या टोळीतील सर्व सदस्य वृद्ध असल्यानं कोणत्याही सराफी दुकानदाराला ते चोरटे आहेत, असा संशय आला नव्हता. पोलिसांनी एका दरोड्याचा सखोल तपास केला संपूर्ण टोळीला अटक केली. सराफी दुकानातील चोरीचा तपास करताना डोईवाला कोतवाली पोलिसांनी महाराष्ट्रातील 'वयस्करांची टोळी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या सहा सदस्यांना अटक केली. पोलिसांनी दरोड्यातील सर्व सोने ताब्यात घेतले आहेत. त्यात सुमारे ७ लाख रुपये किमतीच्या सहा सोन्याच्या साखळ्यांचा समावेश आहे.

८ मे रोजी, काही पुरुष आणि म हिला दागिने खरेदी करण्याच्या बहाण्यानं डोईवाला येथील 'कंचन ज्वेलर्स' दुकानात गेले. दुकानाचे मालक सुरेंद्र कुमार कक्कर यांचे लक्ष विचलित करण्यासाठी त्यांना गप्पांमध्ये गुंतविले. त्यावेळी त्यांनी सहा सोन्याच्या साखळ्या चोरल्या होत्या. सराफा दुकानदाराच्या तक्रारीवरून, ९ मे रोजी डोईवाला कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डेहराडूनचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक (एएझ) यांच्या निर्देशानुसार पोलीस पथक स्थापन करण्यात आले.

पळून जाण्यापूर्वी केली अटक- सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांची ओळख पटवली. १३ मे रोजी, एका खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी हर्रावाला रेल्वे स्थानकावर आंतरराज्यीय 'वयस्करांची टोळी'शी संबंधित सहा आरोपींन अटक केली. याामध्ये ८० वर्षीय महिलेचाही समावेश होते. हे सर्वजण महाराष्ट्रात पळून जाण्याच्या प्रयत्नात होते.ल या टोळीतील काही सदस्य सराफा दुकानदाराशी नेहमी घासाघीस करून त्याचं गुंतवून त्याचे लक्ष विचलित करत असत. तर टोळीतील इतर सदस्य संधीचा फायदा घेऊन चोरी करत असत. टोळीतील बहुतांश सदस्य वृद्ध असल्यानं लोकांना ते गुन्हे करत असतील, अशी कोणालाच पुसटशी कल्पनादेखील येत नव्हती.

इतर राज्यातही केलेत गुन्हे- गुन्हा केल्यानंतर,आरोपी तात्काळ महाराष्ट्रात पळून जात असल्यानं त्यांना अटक करणं पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. आरोपींनी देहरादूनमधील इतर ठिकाणीही चोऱ्यांचे प्रयत्न केले होते. परंतु दुकानदारांच्या सतर्कतेमुळे चोरीचे प्रयत्न फसला होते. चौकशीदरम्यान टोळीनं इतर राज्यांमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची पोलिसांकडं कबुली दिली आहे.

सर्व आरोपी महाराष्ट्राचे- अटक करण्यात आलेले सर्व आरोपी महाराष्ट्रातील रहिवासी: अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये रायगड येथील रहिवासी पांडुरंग (७६ वर्षे); ठाणे येथील वासुदेव नामदेव शिंदे (५७वर्षे); ठाणे येथील सतीश नाम देव शिंदे (३९ वर्षे); ठाणे येथील मनीष मनोहर मोरे (४६ वर्षे); रायगड येथील मंगेश सुर्वे (३४ वर्षे); आणि सातारा येथील राजेंद्र जाधव यांची पत्नी विमल (८० वर्षे) यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी महाराष्ट्राचे रहिवासी आहेत. गुन्हेगारांना अटक करण्याच्या दृष्टीनं ''ऑपरेशन प्रहार'' अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या मोहिमा अविरतपणे सुरूच आहेत, असे एसएसपी प्रमेंद्र डोबाल यांनी सांगितलं.

## नीट पेपरफुटी प्रकरणाचा अभाविप लातूरकडून तीव्र निषेध




**लातूर/प्रतिनिधी :** नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अभाविप लातूर शाखेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला आणि संबंधित दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

या प्रसंगी बोलताना ऋतुजा अट्टल यांनी सांगितले की, नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून ही विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी आणि त्यांच्या भविष्याशी खेळ करणारी आहे. दरवर्षी सुमारे २० ते २२ लाख विद्यार्थी ही परीक्षा देतात. अशा महत्त्वाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असतील, तर विद्यार्थ्यांचा प्रशासन, शिक्षणप्रणाली आणि परीक्षांवरील विश्वास ढासळण्याची भीती आहे, असे त्यांनी नमूद केले.

तसेच प्रशासन आणि यांनी विद्यार्थ्यांना ठोस आश्वासन द्यावे की भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडणार नाहीत. २०२६ मधील नीट युजी परीक्षेत समोर आलेले पेपरफ ुटीचे प्रकरण धक्कादायक असून, २०२४ मध्येही अशाच प्रकारचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते, अशी टीका त्यांनी केली.

अभाविपच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा प्रणाली राबविण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.या वेळी महानगर मंत्री निशिगंधा बेंबळे, सहमंत्री शुभम शिरसागर, जिल्हा संयोजक भागवत बिरादार, ऋतुजा अट्टल, कृष्णा धरणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# उद्योग भवनच्या व्यापाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणार

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांची ग्वाही

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था (उद्योग भवन) ही वसाहत म्हणजे मुंबईतील बीकेसीप्रमाणे लातूरचे व्यापारी केंद्र आहे. येथील व्यापारी महापालिकेला कर भरून उत्पन्नाचा मोठा स्त्रोत निर्माण करतात, त्यामुळे त्यांना संरक्षण आणि सोयीसुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज येथे केले.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी लातूर शहरातील उद्योग भवन येथील लातूर अर्बन को-ऑप.बँकेच्या सभागृहात लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन) येथील व्यापाऱ्यांची राज्य शासन व महापालिकास्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातील आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे आयुक्त मानसी मीना, लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन)चे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, चेअरमन अशोक लोया, उपविभागीय अधिकारी रोहिणी नरे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, नगररचनाकार महाजन,जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर निखिल पाटील, मधुर चित्ते, रामविलास लोया, हुकूमचंद कलंत्री, ईश्वरप्रसाद डागा, शुभदा रेड्डी, अभय शहा, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट किरण जाधव, टेवेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, नवनीत भंडारी, आदिनाथ सांगवे, दिलीप माने, केतन हलवाई, रमेश भुतडा, गणेश हेड्डा, एडवोकेट दासराव शिरुरे, केतन हलवाई, अंबुरे मॅडम, पवन नावंदर, प्राध्यापक शिवराज मोटेगावकर,



मालपाणी, विठ्ठलराव चित्ते, अभिलाष बरबडे, भालचंद्र सोनकांबळे, वेंकटेश पुरी, आदिसह महानगरपालिका, उद्योग, महसूल, नगरविकास विभागाचे संबंधित अधिकारी लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन) येथील व्यापारी उपस्थित होते.

प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर अर्बन को-ऑप.बँकेतिल छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या. लातूर (उद्योग भवन) येथील व्यापाऱ्यांच्या राज्य शासन व महापालिकास्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातील अडचणी लवकरच सोडवू असे सांगीतले. यावेळी आमदार अमित देशमुख यांनी बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना महानगरपालिकेने या वसाहतीमधील रस्ते, नाली आणि पथदिव्यांचा विकास करण्यासाठी तातडीने मास्टर प्लॅन तयार करावा. लेआउट, गुंठेवारी आणि प्रॉपर्टी ओनर परवानगी यांसारखी महापालिकास्तरावरील सर्व कामे तात्काळ पूर्ण करावीत. राज्यातील अशा ५३ वसाहतींच्या संदर्भात सरकार धोरण तयार करत असून, लातूरमधील २८ एकर जमिनीचा प्रश्न आणि व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी लवकरच सोडवू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या. लातूर (उद्योग भवन)चे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी यांनी राज्य शासन व महापालिका, उद्योग महसूल नगररचनाकार विभागस्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातील अडीअडचणची प्रास्ताविक सादर करताना सविस्तर माहिती दिली.

# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय महिनाभरात सुरू होणार

## मुरूड येथील महाराजस्व समाधान शिबिरात आ. रमेशआप्पा कराड यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी** : मागील काही वर्षांपूर्वीच मोठी बाजारपेठ असलेल्या मुरुड येथे नगर परिषद आणि तहसील कार्यालय सुरू व्हायला हवे होते, मात्र झाले नाही यासाठी आमचे प्रयत्न आहेत, शासन स्तरावरील पूर्तता पूर्ण झाल्याने येत्या महिन्याभरात मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू होईल आणि नगरपरिषद निर्मितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला इतर प्रक्रिया पूर्ण करून सहा महिन्यात नगरपरिषदेचा ही प्रश्न मार्गी लागेल अशी माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, अति. गटविकास अधिकारी सतिष चोरमले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, पंस सदस्या पंकज गायकवाड, सुचिता अंधारे, भाजपाचे






मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, राजकिरण साठे, महेश कणसे, लताताई भोसले, जनाबाई साखरे, श्रुती सवयी, रवी माकोडे, किरण मुंडे, शुभम खोसे, तिलोतमा गाडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी मुरुड महसूल मंडळातील नागरीक, महिला, पुरुष तसेच विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रात आणि राज्यात परिवर्तन झाल्यानंतर शासनाच्या वतीने गोरगरीब सर्वसामान्यांना केंद्रबिंदू म्हणून अनेक योजना सुरू केल्या. या सर्व विविध कल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देऊन यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, जनतेचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे शिबिर चालू राहणार आहे. लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी गोरगरीब सर्वसामान्यांची लहान मोठी प्रश्न या शिबिरातून सोडून घ्यावेत त्यांना दिलासा द्यावा लातूर ग्रामीण मतदार संघातील ठिकठिकाणीच्या समाधान शिबिरात शेकडो जणांच्या तक्रारी आणि प्रश्न सोडविण्याचे काम झाले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

पुढे बोलताना आमदार कराड म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना राज्यशासनाने हाती घेतली असून प्रत्येक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे काम येत्या दोन वर्षात सरकारच्या माध्यमातून होणार आहे. स्वतः चे कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नाही शासनाने कबाली देण्याचा निर्णय घेतला असून येत्या काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही याची दखल घेतली जाणार आहे. पटवली रुपयाच्या योजना शासनाच्या माध्यमातून राबविल्या जातात मात्र त्याचा लाभ जनतेला मिळत नसेल तर काय उपयोग असा प्रश्न उपस्थित करून मुरुड येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांनी सोडवावा अशी सूचना करून येत्या आठ दिवसात हा प्रश्न निकाली काढण्यात यावा असे बोलून दाखविले.

यावेळी समाधान शिबिरातून देण्यात येणाऱ्या सोयी, सुविधा आणि योजनांची माहिती उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी दिली. या शिबिरात लखपती दीदी प्रमाणपत्र, लेक लाडकी योजनेचा हप्ता वाटप, बेबी केअर किट, शेळी गट वाटप, मंडलातील गाव नकाशे वाटप, संगायो योजना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, आयुष्यमान भारत कार्ड, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, स्वयंसहायता समूहांना बँकेमार्फत धनादेश वितरण, ट्रॅक्टर वाटप यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले.

समाधान शिबिर स्थळी उभारण्यात आलेल्या विविध शासकीय स्टॉलला आ. कराड यांनी भेट देऊन सूचना केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तहसीलदार गणेश सरवदे यांनी केले तर शेवटी महेश कणसे यांनी आभार मानले. या शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

## लातूर येथे २५ मे रोजी 'पेंशन अदालत' चे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** :नागपूर महालेखाकार कार्यालय आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी २५ मे २०२६ रोजी 'पेंशन अदालत' (निवृत्तीवेतन सभा) चे आयोजन करण्यात आले आहे. ही अदालत सकाळी ११ वाजता लातूर येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे असलेल्या डीपीडीसी हॉलमध्ये पार पडणार आहे.

या पेंशन अदालतीमध्ये निवृत्तीवेतनधारकांच्या विविध अडीअडचणी व प्रलंबित प्रकरणांवर चर्चा करून त्यांचे निवारण करण्यात येणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, शासकीय अधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व निवृत्तीवेतनधारक (पेन्शनर्स) यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. संबंधितांनी २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरच्या जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला भा. पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## मान्सूनपूर्व तयारीद्वारे महाराष्ट्रातील यंत्रणा सुसज्ज

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी मॉन्सून हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम आणि समन्वयित करण्याच्या उद्देशाने मान्सून काळातील पूर, शहरी पूरस्थिती, दरडी कोसळणे, धरण व्यवस्थापन, स्थलांतर नियोजन, पूर्वसूचना प्रणाली, संसाधनांचे व्यवस्थापन आणि मान्सूनपूर्व तयारीद्वारे महाराष्ट्रातील यंत्रणा सुसज्ज करण्यात येत असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिली आहे.

'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था' (एनआयडीएम), महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी यांच्यातर्फे संयुक्तरित्या 'महाराष्ट्रातील मान्सूनपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित करण्यात आला. यामध्ये अंतिम टप्प्यापर्यंत संपर्क व्यवस्था मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. संदेशवहन तंत्रज्ञान (सीएपी) आधारित सूचना, सचेत प्रणाली, लघु संदेश अलर्ट आणि आधुनिक पूर्वसूचना तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराबाबतही प्रशिक्षण देण्यात आले. राज्यातील जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, महसूल, सिंचन, नगर विकास, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, अग्निशमन सेवा, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) जवान तसेच महानगरपालिका, स्थानिक संस्थांमधील अधिकारी या प्रशिक्षणात सहभागी झाले.

महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल आणि केंद्र सरकारच्या एनआयडीएमचे कार्यकारी संचालक मधुप व्यास यांनी यशदाचे महासंचालक सुहास दिवसे यांच्या सहाय्याने नियोजन केले. एसडीएमएचे संचालक भालचंद्र चव्हाण यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. भारतीय हवामान विभाग, केंद्रीय जल आयोग, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांसह विविध तांत्रिक संस्थांतील तज्ज्ञांनी सहभागी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात तांत्रिक सादरीकरणे, गटचर्चा, स्थळभेटी तसेच २००५ मुंबई पूर आणि २०१९ व २०२१ मधील कोकण पूरस्थितीवर आधारित टेबलटॉप सिम्युलेशन्सद्वारे प्रत्यक्ष आपत्ती व्यवस्थापन कौशल्यांचा आढावा घेण्यात आला. राज्यात वाढते शहरीकरण, हवामान बदल आणि पूरप्रवण क्षेत्रांतील वाढती जोखीम लक्षात घेता, मान्सूनपूर्व तयारी अधिक प्रभावी करून आपत्ती जोखीम कमी करणे आणि समन्वित प्रतिसाद यंत्रणा मजबूत करणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

महाराष्ट्रातील बदलत्या पावसाच्या पद्धती आणि पूरधोक्याबद्दल जनतेत आणि संबंधित घटकांमध्ये समज वाढवणे, तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय निरीक्षण/नोंदी यांचा वापर करून पूर्वसूचना प्रणाली आणि अचूक पूराचे इशारे देणे, राज्यातील अगदी शेवटच्या (प्रत्येक) व्यक्तिपर्यंत वेळेत इशारे पोहोचवणे आणि परिणामावर आधारित अंदाज देणे, विविध विभागांमधील समन्वय आणि घटना प्रतिसाद प्रणाली (आयआरएस) अधिक प्रभावीपणे राबविणे, प्रभावी स्थलांतर नियोजन आणि निवारा व्यवस्थापन करणे, एनडीएमए आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या नियमांनुसार आपत्तींची त्वरित माहिती नोंदवणे या मुद्यांवर प्रशिक्षणात भर देण्यात आला. राज्य आपत्कालीन कार्यकेंद्राने केंद्र व राज्याच्या विविध यंत्रणाच्या सहकार्याने विकसित केलेल्या गाव पातळीपर्यंतच्या आपत्ती बाबत माहिती देणारी प्रणाली/डॅशबोर्डचे स्थानिकीकरण व वापर अतिवृष्टी परिस्थितीवरील टेबलटॉप सिम्युलेशन्सद्वारे प्रात्यक्षिक प्रशिक्षणातून आपत्ती पूर्वतयारी, समन्वय आणि स्थानिक पातळीवरील क्षमता वृद्धीसाठी कार्यवाही केली जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# सीएनजी दुर्घटना नियंत्रणासाठी विविध यंत्रणांची संयुक्त रंगीत तालीम

## लातूरमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रभावी सादरीकरण

**लातूर/प्रतिनिधी** : आपत्कालीन परिस्थितीत विविध शासकीय विभागांमधील समन्वय आणि तत्परता तपासण्यासाठी महानगर गॅस लिमिटेडच्या वतीने लातूर येथे सीएनजी सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन विषयावर भव्य संयुक्त प्रात्यक्षिकाचे (मॉक ड्रील) आयोजन करण्यात आले होते. संभाव्य गॅस गळती आणि आग दुर्घटनेच्या वेळी आपत्कालीन यंत्रणा कशा प्रकारे कार्य करतात, याचे यशस्वी सादरीकरण यावेळी करण्यात आले.

या रंगीत तालमीमध्ये एका सीएनजी वाहनाला गॅस गळतीमुळे आग लागल्याची काल्पनिक परिस्थिती निर्माण करण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच महानगर गॅसच्या कर्मचाऱ्यांनी प्राथमिक स्तरावर आग विझवण्याचे प्रयत्न केले. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महानगरपालिका अग्निशमन दल आणि पोलीस वाहतूक शाखा या यंत्रणांना त्वरित पाचारण करण्यात आले.



घटनेनंतर काही मिनिटांतच अग्निशमन दलाच्या गाड्या आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींना तातडीची वैद्यकीय मदत देऊन रुग्णालयात हलविणे, वाहतूक पोलिसांनी परिसराची नाकेबंदी करणे आणि अग्निशमन जवानांनी शिस्तबद्ध पद्धतीने आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवणे, अशा टप्प्यांत ही मोहीम राबवण्यात आली. यातून विविध विभागांमधील अचूक समन्वय आणि जलद प्रतिसाद प्रणाली दिसून आली.

या उपक्रमास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे, महापालिका अग्निशमन अधिकारी बापूसाहेब जाधव, आनंद शिंदे, तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे अधिकारी अतुल डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपविभागातर्फे डॉ. प्रमोद पाटील यांनी या संपूर्ण प्रक्रियेचे सूक्ष्म निरीक्षण केले. महानगर गॅसचे लातूर व धाराशिव जिल्हा प्रमुख राकेश तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद शितोळे, समीर संकपाळ, पल्लव भुते, अक्षय कुचेकर आणि संतोष हल्लाळे यांनी या रंगीत तालमीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# मान्सून २६ मे रोजी केरळात दाखल होणार, हवामान खात्याचा अंदाज

**मुंबई/प्रतिनिधी :** उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार २६ मे रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. घ्श्ऊ च्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. त्याचबरोबर ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी, माहे आणि दक्षिण कर्नाटकात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १३ ते १९ मे दरम्यान ईशान्य भारतात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. काही भागांत ताशी ५० ते १०० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने त्याचा परिणाम पुढील काही दिवस देशातील हवामानावर दिसून येणार असल्याचे घ्श्ऊ ने स्पष्ट केले आहे. एकीकडे मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असताना, दुसरीकडे उत्तर-पश्चिम, पश्चिम आणि मध्य भारतात उष्णतेची लाट कायम आहे. राजस्थानमधील बारमेर येथे देशातील सर्वाधिक ४८.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

घ्श्ऊ च्या अंदाजानुसार, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकणात पोहोचू शकतो. तसेच ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येण्याची शक्यता कमी असल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे.

# नाले सफाईच्या माध्यमातून पाण्याचा निचरा होण्यास प्राधान्य द्यावे : स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांचे निर्देश

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या सुचने नुसार सभापती बंडापल्ले यांनी केली नालेसफाई कामाची प्रत्यक्ष पाहणी

**लातूर/प्रतिनिधी** : महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून मान्सुनपूर्व नाले सफाईचे काम युध्दपातळीवर करावे अशी सुचना करुन पावसाचे पाणी निचरा होण्यास प्राधान्य देऊन शहरात कोठे ही पाणी थांबणार नाही अथवा नाली तुंबणार नाहीत याची दक्षता घ्यावी असे निर्देश स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी प्रशासनाला दिले आहेत.

महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून शहरात मान्सुनपूर्व नाले सफाईचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची प्रत्येक्ष पाहणी करुन स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या सुचनेवरुन स्वच्छता विभागाला महत्वपूर्ण सुचना दिल्या.

दरवर्षी मान्सुनपूर्व नाले सफाईचे काम १ मे पासून सुरु होते मात्र मागील अनुभव लक्षात घेता हि मोहीम यावर्षी एक महिना अगोदरच सुरु केली आहे. शहरातील चार ही क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नाले सफाईसाठी चार छोट्या व दोन मोठ्या जेसीबी, एक पोकलेन व सहा हायवा च्या माध्यमातून सदर काम युध्द पातळीवर सुरु आहे. या कामाची स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांच्यासह गटनेते विजयकुमार साबदे, उपायुक्त वसुधा फड, स्वच्छता विभागाचे रमाकांत पिडगे, कलीम शेख आदींनी पाहणी केली.

गतवर्षी मान्सुनपूर्व पावसाने शहरात मोठ्या प्रमाणात नाल्या तुंबुन अस्वच्छता पसरली होती. हा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी नाले सफाई करताना पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल याची दक्षता घेऊन शहरातील कोणत्याही भागात नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही यास प्राधान्य द्यावे असे निर्देश स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिले. विशेषत: रिंग रोडसह पाच नंबर चौक आणि समांतर रस्ता या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचते याकडे लक्ष वेधुन सभापती बंडापल्ले यांनी या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी कायम स्वरूपी व्यवस्था करावी अशी सुचना दिली आहे. शहरातील प्रत्येक



गल्ली बोळातील नाल्यांची सफाई होऊन या ठिकाणी कचरा अडकु नये याकरीता आवश्यक असणाऱ्या उपाय योजना कराव्यात असे निर्देश देऊन या कामा मध्ये नगरसेवकांनी दिलेल्या सुचना ही लक्षात घ्याव्यात असे सांगुन नाले सफाईच्या कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये अशी अपेक्षा स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी व्यक्त केली. यावेळी उपायुक्त वसुधा फड यांनी नालेसफाईचे काम ७० टक्के पुर्ण झाले असल्याची माहिती देऊन सभापतींनी केलेल्या सुचने नुसार सर्व कामे वेळेत पुर्ण करण्यात येतील असे सांगीतले.

शहरातील काही भागात नालीवरील पुलावर पाणी साचुन वाहन धारकांचे अपघात होतात. या बाबत खबरदारी घेण्यासाठी शहरातील अशा ठिकाणांची पाहणी पोलीस अधीक्षक यांच्या सुचने नुसार अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्यासह स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले व मनपाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. जेथे जेथे नाल्या तुंबून पुलावर पाणी येते तेथील नालीसफाई करताना प्रशासनाने काळजी घुऊन तेथील अडचण कायम स्वरुपी सोडवावी अशा सुचना अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व सभापती सचिन बंडापल्ले यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.